# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

## संचालनालय, लेखा व कोषागारे

नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, संगणक कक्ष, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनीक्रमांक:- ०२२-२२०२९१२८ email id: idit-dat@mah.gov.in

जा.क्र. - संचालनालय ले व को/ संगणक शाखा/TreasuryNet/२०२५/९८६ दिनांक: १६/०५/२०२५

# परिपत्रक

विषय : ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये समस्या उपस्थित करण्यासाठी तिकीट सुविधा
(Ticketing Facility to raise the issues in the TreasuryNet system)

राज्यातील सर्व जिल्हा कोषागार कार्यालये, सर्व उप कोषागार कार्यालये आणि अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांनाः ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये दैनंदिन वापर करताना अडचणी, समस्या उद्भवल्यानंतर त्या समस्यांच्या निराकरणासाठी सद्यस्थितीत ट्रेझरीनेट टीमला ई-मेल द्वारे, फोनद्वारे कळवावे लागते. अनेकवेळा ई-मेल द्वारे कळविण्यात आलेला संदेश परिपूर्ण नसल्यामुळे अधिक माहितीसाठी ट्रेझरीनेट टीमला वारंवार संबधीत कार्यालयासह पाठपुरावा करावा लागतो. काही वेळा एकाच समस्येसाठी वेगवेगळे ई-मेल संदेश पाठविले जातात, परिणामत: मूळ समस्या पाठपुरावा, पुरक माहिती, निराकरण निश्चिती इत्यादी बाबत सर्व स्तरावर गोंधळाची स्थिती निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर समस्येचे निराकरण प्रयोजनार्थ ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये समस्या उपस्थित करण्यासाठी तिकीट सुविधा (Ticketing Facility to raise the issues in the TreasuryNet system) विकसित करण्यात आलेली आहे.

सदर सुविधेबाबत अधिक तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) ट्रेझरीनेट प्रणालीमधील सर्व वापरकर्ते यांना आपापल्या लॉगइन मध्ये ही सुविधा देण्यासाठी 'Main Manu मध्ये Administrator हा Tab उपलब्ध आहे.

२) या Administrator Tab खाली Raise Ticket हा पर्याय देण्यात आला आहे.

३) ही सुविधा वापरताना मराठी आणि इंग्लिश या दोन भाषांचा पर्याय देण्यात आला आहे.

४) Raise Ticket या Tab मध्ये समस्या मांडण्यासाठी एक फॉर्म देण्यात आला आहे. सदर फॉर्म दिसू लागेल त्याच वेळी स्क्रीनच्या डाव्या बाजूला Dashboard, 'Ticket Form, 'Ticket Status हे पर्याय दिसू लागतील.

५) Dashboard मध्ये Total Raised Issue Count (एकूण समस्यांची संख्या), Total Resolved Issue Count (निराकरण करण्यात आलेल्या समस्यांची संख्या), In Process Issues Count (निराकरण प्रक्रिया सुरू असलेल्या समस्यांची संख्या), Additional Information Required Count (आवश्यक असलेली अतिरिक्त माहिती मागणी केलेल्या समस्यांची संख्या) इत्यादी Tabs देण्यात आलेले आहेत. या Tab वर Click केल्यानंतर त्यामधील तपशीलवार माहिती दिसू लागेल.

६) Raise Ticket या पर्यायामध्ये देण्यात आलेल्या फॉर्ममध्ये सर्व आवश्यक तपशील भरण्यात यावा.

७) समस्येचा सर्व तपशील या फॉर्म मध्ये भरल्यानंतर Submit (प्रविष्ट करा) हा पर्याय वापरावा.

Scanned with OKEN Scanner

८) त्यानंतर या प्रविष्ट झालेल्या समस्येसाठी या सुविधेमधून तयार झालेला तिकीट क्रमांक (Ticket Number generated) दिसू लागेल.

९) Ticket Status या पर्यायावर Click केल्यानंतर आपल्याला दिनांक (पासून ते पर्यंत) हा पर्याय दिसू लागेल. यामध्ये दिवस कालावधी नमूद केल्यानंतर या कालावधीमधील तिकीटांची अद्ययावत स्थिती आपल्याला दिसू लागेल. या तिकीटाच्या बाजूला -तपशील पहा (View Details)हा पर्याय दिसू लागेल. या मध्ये संबंधित तिकीटाचा संपूर्ण तपशील दिसू लागेल.

या सुविधेचा वापर सुरू झाल्यानंतर आपल्या समस्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे ई-मेल, लेखी पत्र ट्रेझरीनेट टीमला आणि राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना पाठविण्यात येऊ नये. आपण उपस्थित केलेल्या समस्येचे निराकरण झाल्यानंतर त्याबाबतची माहिती आपल्याला तात्काळ Ticket Status या पर्यायामध्ये दिसू लागेल. यासाठी ट्रेझरीनेट टीम कडून आपल्याला स्वतंत्रपणे ई-मेल संदेश प्राप्त होणार नाही. समस्येच्या निराकरणास विलंब लागल्यास पाठपुरावा करण्यासाठी केवळ ई-मेल अथवा व्हॉट्सऍप संदेश ट्रेझरीनेट टीमला पाठवावा. या संदेशामध्ये तिकीट क्रमांक, कोषागार / उपकोषागार यांचे नाव व संकेतांक यांचा अचूक उल्लेख करावा.

सदर सुविधा दिनांक १९ मे २०२५ पासून सर्व जिल्हा कोषागार, सर्व उपकोषागार आणि अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

करीता आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना

16/5/25

(दीपा देशपांडे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत: आवश्यक कार्यवाहीस्तव

१. विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे ( सर्व)*
२. अधिदान व लेखा अधिकारी,कार्यालय, मुंबई.*
३. वरिष्ठ कोषागार अधिकारी (सर्व) **
४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)**
५. उपकोषागार अधिकारी (सर्व)**
६. सहायक संचालक, ट्रेझरीनेट *

प्रत: माहितीस्तव

१. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे *
२. सहायक संचालक, ट्रेझरीनेट*
३. कोषागार व्यवस्थापन शाखा (TM)*

*ई-मेलद्वारे निर्गमित

** विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांचेमार्फत अधिनस्त कार्यालयांना अवगत करण्यास्तव

**टिप: सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर Circulars and Orders - IT & Reforms Circulars या Tab अंतर्गत उपलब्ध आहे.**

Scanned with OKEN Scanner